# Shameful

# सरन्यायाधीश गवईंवर सनातनी वकिलाकडून बुटफेक

## या गोष्टींनी मला फरक पडत नाही– सरन्यायाधीश भुषण गवई


दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४२३ वा • मंगळवार, ता. ७ ऑक्टोबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


**नवी दिल्ली । रयत समाचार**

**घटनेनंतर सर्वोच्च न्यायालयात सुरक्षा वाढवण्यात आली असून हल्लेखोर वकिलावर कठोर कारवाईची मागणी होत आहे. देशाच्या न्यायसंस्थेवरील विश्वास टिकवण्यासाठी आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी हा प्रसंग राष्ट्रासाठी एक गंभीर इशारा मानला जात आहे.**

देशाच्या सर्वोच्च न्यायालयात सोमवारी धक्कादायक घटना घडली. न्यायालयीन इतिहासात क्वचितच पाहायला मिळणारी घटना म्हणजे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या दिशेने एका सनातनी वकिलाने बूट फेकल्याची. ही घटना सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुरू असलेल्या एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान घडली. मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. राकेश किशोर कुमार (नोंदणी २०११) या व्यक्तीने अचानक, ''भारत सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही!'' अशी घोषणाबाजी करत सरन्यायाधीशांच्या दिशेने बूट फेकला. सुदैवाने तो बूट गवई यांच्यापर्यंत पोहोचला नाही. तात्काळ न्यायालयीन सुरक्षारक्षकांनी त्या वकिलाला ताब्यात घेतले. वकिलाची नाराजी काही महिन्यांपूर्वी सरन्यायाधीश गवई यांनी मध्य प्रदेशातील खजुराहो येथील भगवान विष्णूच्या सात फूट उंच पुतळ्याच्या जीर्णोद्धाराविषयी केलेल्या एका टिप्पणीवरून असल्याचे समजते. त्यावर गवई यांनी त्यावेळी दिलगिरीही व्यक्त केली होती, मात्र संबंधित वकिलाने ती बाब मनावर घेतली आणि हा अविचाराचा मार्ग अवलंबिला. घटनेनंतर न्यायालयीन वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले. मात्र, सरन्यायाधीश गवई यांनी संपूर्ण प्रसंगाला अत्यंत शांतपणे हाताळले. त्यांनी न्यायालयात उपस्थित वकिलांना उद्देशून सांगितले, या सर्व गोष्टींनी त्रास करून घेऊ नका. मलाही या गोष्टींनी फरक पडत नाही. आपण काम सुरू ठेवूया. त्यांच्या या शांत आणि संयमी प्रतिक्रियेमुळे न्यायालयातील वातावरण पुन्हा स्थिर झाले आणि कामकाज सुरळीत सुरू राहिले. सर्वोच्च न्यायालयाच्या सुरक्षेचा आणि शिस्तीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला असून, या घटनेचा सखोल तपास सुरू केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या घटनेला ''अभूतपूर्व, लाजिरवाणी आणि घृणास्पद'' अशी प्रतिक्रिया दिली. ही घटना न्यायपालिकेच्या सन्मानावर व कायद्याच्या राज्यावर झालेला हल्ला आहे. ज्यांनी सामाजिक बंधने तोडून प्रामाणिकपणे, कर्तृत्वाच्या बळावर सर्वोच्च पद मिळवले त्या सरन्यायाधीशांना लक्ष्य करणे म्हणजे भीतीदायक प्रवृत्तीचे दर्शन आहे, असे खरगे म्हणाले. त्यांनी पुढे म्हटले, अंधश्रद्धा, द्वेष आणि धार्मिक कट्टरतेचा विळखा गेल्या दशकात समाजाला वेढत आहे. न्यायव्यवस्थेची सुरक्षा ही राष्ट्राच्या सन्मानाची बाब आहे, धाकदपटशाही नव्हे, न्याय आणि विवेक प्रस्थापित व्हावा. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी देखील या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करताना म्हटले, सर्वोच्च न्यायालयावर आणि राष्ट्राच्या सर्वोच्च न्यायिक पदावर झालेला हा हल्ला अत्यंत गंभीर आहे.

सरन्यायाधीश गवई यांनी दाखवलेले संयम, शांतता आणि उदारता या संस्थेच्या सामर्थ्याचे प्रतीक आहेत, पण त्यामुळे या घटनेला हलक्यात घेता येणार नाही. ते पुढे म्हणाले, हल्लेखोराने दिलेले कारण पाहता समाजात अद्याप दडलेली जातीय व दडपशाही वृत्ती किती खोलवर रुजलेली आहे, हे दिसते. आपण आपल्या संस्थांचा सन्मान राखणारी आणि परिपक्वता दाखवणारी संस्कृती जोपासली पाहिजे. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी या घटनेला ''अलार्मिंग'' म्हणत तीव्र शब्दांत निषेध केला. हा प्रकार 'संघ परिवाराने पसरवलेल्या द्वेषाचा परिपाक' आहे. याला केवळ एका व्यक्तीचा प्रकार म्हणणे म्हणजे असहिष्णुतेच्या वाढत्या वातावरणाकडे दुर्लक्ष करणे होय. जेव्हा धार्मिक कट्टरतेचा विळखा इतका वाढतो की तो सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांपर्यंत पोहोचतो, तेव्हा त्याचा समाजावरचा धोका स्पष्ट दिसतो, असे विजयन म्हणाले. दरम्यान, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने या प्रकाराचा निषेध करत निवेदन जारी केले. सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर उघड न्यायालयात बूट फेकणे आणि 'सनातन धर्मा'च्या समर्थनार्थ घोषणा देणे हा अतिशय धक्कादायक प्रकार आहे. काही सत्ताधारी नेत्यांनी गेल्या काही काळात पसरवलेल्या जातीय, मनुवादी आणि सांप्रदायिक विचारांनी अशा प्रवृत्तीला खतपाणी घातले आहे. संघ परिवाराच्या असहिष्णु वृत्तीचे हे आणखी एक उदाहरण आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले.



**सनातनचा अपमान सहन करणार नाही असं म्हणत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर वकिलाने कोर्टात बूट फेकण्याचा प्रयत्न केला. ही घटना न्यायालयासाठीच नाही, तर पूर्ण देशासाठी शरमेची बाब आहे. धर्माच्या नावावर उन्माद माजवणारे हे लोक भाजप आरएसएस च्या पाठिंब्याने अतिशय मोकाट झाले आहेत, रस्त्यावरचा उन्माद थेट सर्वोच्च न्यायालयावर बूट फेकण्यापर्यंत पोहोचला आहे अशा शक्तींना व विचारांना वेळीच रोखले पाहिजे आज देशात विचार, तर्क आणि संयम यांची जागा धर्मांधता, सत्तेचा माज आणि उन्मादाने घेतली आहे. हा संविधान, लोकशाही आणि न्यायसंस्थेवर उघड हल्ला आहे. हल्ला करणाऱ्या वकिलावर कठोर कारवाई करण्यात यावी**

**– कॉ.ॲड. सुभाष लांडे**
राज्य सेक्रेटरी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष

**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावर न्यायालयाच्या आवारातच हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची घटना ही अत्यंत धक्कादायक व अस्वस्थ करणारी आहे. न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च आसनावर असणाऱ्या व्यक्तीला अशा प्रकारे लक्ष्य करण्याची बाब चीड आणणारी तर आहेच शिवाय संविधानाचा अवमान करणारी आहे. न्यायव्यवस्थेवर अशा प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न करून दबाव आणण्याचे डावपेच लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना घातक आहेत. मात्र तरीही भारतीय न्याय व्यवस्था अशा भ्याड कृत्यापुढे झुकणार नाही. सुदृढ लोकशाही टिकून राहावी यासाठी न्यायालयाचा सन्मान राखणे, न्यायमूर्तींची सुरक्षा सुनिश्चित करणेच्या बाबींकडे सरकारने लक्ष द्यावे. केंद्रसरकारने या प्रकरणात न्यायाधीशांचा अवमान करणाऱ्यांविरुद्ध कायद्याच्या चौकटीत राहून कठोरात कठोर कारवाई करावी, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सुरक्षा उपाययोजना अधिक बळकट कराव्यात. न्यायसंस्थेचा सन्मान आणि स्वातंत्र्य हेच आपल्या लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या आधारस्तंभांना धक्का पोहोचू नये यासाठी सरकार, समाज आणि प्रत्येक नागरिकाने जागरूक राहणे ही काळाची गरज आहे.**


**– शाहू छत्रपती,** कोल्हापूर

## हल्ल्याचा सुप्रीम कोर्ट वकील संघांकडून निषेध

### न्यायव्यवस्थेचा अपमान असह्य

**नवी दिल्ली । रयत समाचार**

सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर एका वकिलाने केलेल्या अयोग्य आणि अविवेकी कृतीचा सुप्रीम कोर्ट ॲडव्होकेट्स- ऑन-रेकॉर्ड असोसिएशनने (SCOARA) एकमुखी निषेध नोंदवला आहे. संघटनेने या प्रकाराला वकील व्यवसायाच्या सन्मानाला आणि न्यायालयीन शिस्तीला तडा देणारा म्हणून तीव्र शब्दांत धिक्कार केला आहे. संघटनेच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावात म्हटले आहे की, सरन्यायाधीश आणि त्यांच्या सहकारी न्यायमूर्तींवर वैयक्तिक हल्ला करण्याचा कोणताही प्रयत्न हा न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेवर थेट प्रहार आहे. अशा कृतीमुळे न्यायालयीन व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास डळमळीत होतो आणि बार-बेंचमधील परस्पर आदराच्या नात्याची पायाभरणी हादरते. संघटनेने सर्व वकिलांना व्यावसायिक शिस्त, सौजन्य आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, अशा कृत्यांमुळे न्यायालयाची प्रतिष्ठा मलिन होत असल्याने सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून ( suo motu) अवमानाची कारवाई करण्याचा विचार करावा, असेही ठरावात सुचविण्यात आले आहे. संघटनेचे मानद सचिव निखिल जैन यांनी सांगितले की, स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा अधिकार असला तरी तो संयम आणि जबाबदारीने वापरणे आवश्यक आहे. न्यायालयाचा अपमान करून कोणीही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दावा करू शकत नाही. ठरावाच्या अखेरीस संघटनेने न्यायव्यवस्थेच्या गौरव, स्वायत्तता आणि पवित्रतेच्या रक्षणासाठी सर्व सदस्यांनी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.



SUPREME COURT ADVOCATES-ON-RECORD ASSOCIATION (Regd.)

RESOLUTION

NIKHIL JAIN
Hony. Secretary
SCOARA



### पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

## नाशिकमध्येही उभारणार 'चित्रनगरी'?

**मुंबई । रयत समाचार**

नाशिकला सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या नवे उभारी देणारा ''नाशिक चित्रपटसृष्टी प्रकल्प'' प्रत्यक्षात आणण्यासाठी मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली ता.६ रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. गोरेगाव चित्रनगरीच्या धर्तीवर नाशिकमध्येही सुसज्ज चित्रपटसृष्टी उभारण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त झाला. बैठकीत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, अर्थ विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे पाटील, तसेच अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ नाशिक समिती प्रमुख शाम लोंढे, दिग्दर्शक राजू फिरके, लाईन प्रोड्युसर अमित कुलकर्णी, कला दिग्दर्शक प्रसाद राहणे आणि फिल्म निर्माता अंबादास खैरे आदी उपस्थित होते. तर नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि जिल्हाधिकारी जलज शर्मा हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले. बैठकीत नाशिक चित्रपटसृष्टी प्रकल्पाबाबत सकारात्मक चर्चा झाली असून केंद्र सरकारकडूनही या उपक्रमाला सहकार्य मिळणार असल्याची माहिती देण्यात आली. हा प्रकल्प नाशिक शहरासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रासाठी नवी सांस्कृतिक व आर्थिक दालने उघडणार आहे, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला. नाशिकचा परिपूर्ण आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. नाशिकला नव्या उंचीवर नेणारा हा चित्रपटसृष्टी प्रकल्प यशस्वीपणे साकारण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्नशील राहू, असे मत अजितदादा पवार यांनी व्यक्त केले. नाशिकच्या सांस्कृतिक नकाशावर 'चित्रनगरी'चा नवा उजेड झळकण्याची चिन्हे!

## डॉ.ओम्व्हेट यांच्या विचार विश्वावरील 'तुकोबा ते प्रतिसरकार' ग्रंथप्रकाशन सोहळा

**पुणे । रयत समाचार**

सामाजिक परिवर्तनाच्या विचारधारेला नवे अधिष्ठान देणाऱ्या डॉ. गेल ओमव्हेट यांच्या कार्यावर आधारित ' तुकोबा ते प्रतिसरकार' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा प्रकाशन सोहळा पुण्यातील एस.एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन येथे संपन्न झाला. कार्यक्रमाला ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. बाबा आढाव, दिल्लीच्या जे.एन.यू.मधील प्राध्यापक डॉ. सुरींदर जोधका, लेखिका तथा भारतीय महिला फेडरेशनच्या लता भिशे-सोनवणे, डॉ. भारत पाटणकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी 'गेल लिगसी ग्रुप'ची भूमिका आणि या ग्रंथामागील बौद्धिक प्रयत्न स्पष्ट केले. प्रकाशक दिलीप चव्हाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नागमनी राव यांनी तर आभार प्रदर्शन मीनल जगताप यांनी केले. प्रकाशन सोहळ्याला बीबीसी मराठीचे संपादक अभिजित कांबळे, डॉ. वंदना सोनाळकर, डॉ. अनंत फडके, अरुण खोरे, अनुष मालेकर, स्वातीजा मनोरमा, डॉ. प्रकाश पवार, अरविंद पाटकर, किशोर ढमाले, सोमनाथ वाघमारे, संजय कांबळे, के.जे. जॉय, मुक्ता कदम, प्रतिमा परदेशी, सीमा कुलकर्णी यांच्यासह सामाजिक-सांस्कृतिक चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. डॉ. गेल ओमव्हेट यांच्या तळमळीच्या विचारांचा मागोवा घेणारा हा ग्रंथ समानता, स्त्री-मुक्ती, आणि परिवर्तनाच्या आंदोलनांना दिशा देणारा दस्तऐवज ठरणार असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.




## मुख्यमंत्र्यांची बदनामी; गौरव बक्षीला ५० हजारांचा दंड

**पणजी । रयत समाचार**

गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याविरोधात सोशल मिडियावर व्हिडिओद्वारे बदनामी केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते गौरव बक्षी यांना मुंबई उच्च न्यायालयाने ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. बक्षी यांनी माफी स्वीकारल्यामुळे न्यायालयाने त्यांच्या विरोधातील गुन्हा रद्द करण्याचे आदेश दिले. हा निर्णय न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती आशिष चव्हाण यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने दिला. गौरव बक्षी यांनी 'राज्याच्या वनक्षेत्रात घट होण्यास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत जबाबदार आहेत' असा दावा करणारा व्हिडिओ फेसबुक, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मिडियावर प्रसारित केला होता. वनसंरक्षक आदित्य मदनपात्रा यांनी याची तक्रार गुन्हे शाखेत केली होती. बक्षी खोटी माहिती पुरवून दिशाभूल करत असल्याचे तक्रारीत म्हटले होते. या तक्रारीवरून २ जुलै रोजी बक्षी यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला. बक्षी यांनी हा गुन्हा रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सुनावणीदरम्यान, बक्षी यांचे वकील ॲड. नाईजल कोस्टा फ्राईज यांनी माध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या माहितीच्या आधारे व्हिडिओ प्रसारित केल्याचा दावा न्यायालयासमोर मांडला. सरकारी अभियोक्ता सोमनाथ कर्पे यांनी संबंधित व्हिडिओ आणि त्याची स्क्रिप्ट न्यायालयात सादर केली. न्यायालयाने बक्षी यांना फटकारल्यावर त्यांनी बिनशर्त माफी मागितली. माफीनाम्याचा विचार करून न्यायालयाने त्यांना ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला, जो गोवा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेला दिला जाणार आहे. यानंतर बक्षी यांच्याविरोधात गुन्हा रद्द केला गेला.



अमलीपदार्थांविरुद्ध नवीन मोहीम

## वैद्यकीय तपासणी, शाळा कॉलेज आवारात QR कोड

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**



बेळगाव पोलिसांनी अमलीपदार्थांविरुद्ध सुरू केलेल्या अभियानाचा एक भाग म्हणून आता विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधी प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आला असून, महिनाभरानंतर ही तपासणी सुरू होणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त भूषण गुलाबराव बोरसे यांनी दिली. प्रस्तावानुसार, नववी, दहावीपासून कॉलेजपर्यंतच्या विद्यार्थ्यांपैकी १० टक्के विद्यार्थ्यांची रक्ततपासणी करण्यात येणार आहे. अल्पवयीन विद्यार्थ्यांसाठी पालकांची परवानगी आवश्यक राहणार आहे, तर तरुण विद्यार्थ्यांसाठी स्वतःची परवानगी घेतली जाईल. गेल्या तीन महिन्यांपासून अमलीपदार्थांच्या विक्री व सेवन करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. ही तपासणी पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. प्रत्येक शाळा-कॉलेजच्या आवारात किंवा गर्दीच्या ठिकाणी यासाठी QR कोड लावण्यात येणार आहेत. नागरिक आणि विद्यार्थी बेळगाव पोलिसांच्या संकेतस्थळावर माहिती देऊ शकतात. पोलीस आयुक्तांनी सांगितले की, प्रत्येक सेमिस्टरमध्ये १० टक्के विद्यार्थ्यांची तपासणी केली जाईल. कोणत्याही विद्यार्थ्याला ही तपासणी नाकारण्याचा अधिकार असेल. गांजा किंवा इतर अमलीपदार्थांचा वापर करणाऱ्यांच्या रक्तात त्यांचा अंश किमान एक महिना राहतो, त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी या पदार्थांचा वापर केला आहे, त्यांनी तत्काळ त्याचे सेवन थांबवावे. पालकांनाही शक्यतो घरच्या परिस्थितीत किट वापरून तपासणी करता येईल. या मोहिमेद्वारे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना जागरूक करून अमलीपदार्थांच्या वापरावर नियंत्रण आणण्याचा उद्देश आहे.

# बंजारा समाज : अनुसूचित जमातीत समावेशासाठी मोर्चा

## प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी



**अहमदनगर । रयत समाचार**

गोर बंजारा समाजाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील सर्व लमाण बंजारा समाज बांधवास अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी सोमवार ता. ०६ ऑक्टोबर रोजी या संदर्भात समाजाच्या प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांमर्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्य सचिव महाराष्ट्र यांच्याकडे पाठवले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हैदराबाद गॅझेटीयर व सी.पी. बेरार गॅझेटिअरमध्ये बंजारा समाज हा आदिवासी अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच लमाण बंजारा समाज सर्व निकष पूर्ण करतो आणि आजही आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहे. बहुसंख्य लमाण बंजारा समाज ऊस तोडणी, मजुरी व भटकंती करून उदरनिर्वाह करीत असून, या समाजाला लोकसंख्येनुसार राजकीय प्रतिनिधित्व व नोकरीमध्ये योग्य स्थान मिळालेले नाही.

निवेदनात सांगण्यात आले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकाळात आणि नंतरच्या अनेक वेळा केंद्र व राज्य सरकारकडे या समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी केली गेली आहे. तसेच मुंशी कमिशन (१९२४), ऑल इंडिया जेल कमिशन, डॉ. बी.के. अंतरोळीकर कमिशन (१९५०), देशमुख कमिशन, थाडे कमिशन आणि न्यायमुर्ती बापट आयोग यांनी लमाण-बंजारा समाज हा आदिम जमातीचा असल्याची शिफारस केली आहे. निवेदनात सरकारकडे विनंती करण्यात आली आहे की, बंजारा समाजाला स्वतंत्र आदिवासी (ब) यादीत समाविष्ट करावे, राज्यातील सर्व गोरबंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समावेश करून आरक्षणाचा लाभ मिळवून द्यावा, तसेच केंद्र सरकारकडे याबाबत शिफारस करावी. यावेळी प्रभाकर पवार, मोहन जाधव, रामभाऊ राठोड, रमेश चव्हाण, विजय राठोड यांसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.



# पीए इनामदार शाळेत चित्रकला स्पर्धा; विजेत्यांचा गौरव

## २७ सुवर्ण, १४ रौप्य, १० कांस्यपदकांची कमाई

**अहमदनगर । आबीद खान**

इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी संचालित येस पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम शाळेत चित्रकला स्पर्धा विजेत्यांचा गौरव समारंभ उत्साहात पार पडला. या शाळेतील विद्यार्थ्यांनी ''रंग उत्सव सेलिब्रेशन मुंबई'' तसेच ''नवनीत युथ ऑल इंडिया ड्रॉइंग कॉम्पिटिशन''मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. एकूण ५०० स्पर्धकांमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी चमकदार यश मिळवून अनेक बक्षिसे पटकावली. यामध्ये पहिला क्रमांक मिळविणाऱ्या अक्सा शहबाज तांबोळी हिला स्केट इलेक्ट्रॉनिक स्कूटर देण्यात आली, तर दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या पठाण मसीरा मोहसीन हिला स्केच बुक व ग्राफिक पेन्सिल रायटिंग पॅड देऊन गौरविण्यात आले. याशिवाय पी.ए. इनामदार शाळेला एकूण २७ सुवर्णपदके, १४ रौप्यपदके, १० कांस्यपदके, आकर्षक ट्रॉफीज व प्रमाणपत्रे मिळाली. या प्रसंगी शाळेचे प्राचार्य युनूस ए. के., उपप्राचार्य शेख फरहाना एजाज, संचालक शब्बीर सर, इक़्रा स्कूलचे संपूर्ण व्यवस्थापन, समन्वयक आमिर खान, चित्रकला शिक्षक व इतर शिक्षक उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# प्रोफेसर कॉलनी उकिरड्यात कचरा डेपो स्थलांतराची गरज

## परिसर अस्वच्छ झाल्याने नागरिकांत नाराजी

**अहमदनगर । रयत समाचार**

सावेडी परिसरातील प्रोफेसर कॉलनी चौकाजवळील कचरा डेपो तात्काळ अन्यत्र हलवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या संदर्भात परिसरातील रहिवाशांच्या वतीने प्रणव भिंगारदिवे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांना निवेदन दिले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या डेपोमुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून, रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. माशा, डास आणि विविध कीटकांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असून, लहान मुलांमध्ये आजारपणाचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. संपूर्ण परिसर अस्वच्छ झाल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे. प्रोफेसर कॉलनी हा शहरातील महत्त्वाचा आणि वर्दळीचा भाग असल्याने येथे आरोग्याच्या दृष्टीने गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे डेपो तातडीने हलविण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. डेपो अन्यत्र हलवल्यास परिसर स्वच्छ राहील आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील, असेही निवेदनात नमूद आहे.

नागरिकांनी स्पष्ट केले की, डेपोमुळे दुर्गंधी सतत पसरत असून आजूबाजूच्या वातावरणावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने तात्काळ निर्णय घेऊन कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. या वेळी प्रणव भिंगारदिवे, शोभा भिंगारदिवे, सौरभ ढोकरीया, मनोज बलदोटा, डॉ. सुमित नलावडे, गणेश गावडे, बाळासाहेब निकम, निलेश वाघ, आशुतोष बांगर, अमित गटणे, मीना वाघ, वर्षा बोराडे, सुरेखा भिंगारदिवे, सुनिता आगरकर, शुभम गवळी, सारंग मुळे, रमेश हिवाळे, दीपक आडेप, दिग्विजय गावडे आदींसह प्रोफेसर कॉलनी व आसपासच्या परिसरातील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी; चार वर्षांच्या प्रतीक्षेला अखेर विराम

## शेवगावात महिलाराज!




**शेवगाव । लक्ष्मण मडके**

चार वर्षांची प्रतीक्षा, चर्चांचा महापूर आणि ओबीसी आरक्षणाच्या गुंत्यात अडकलेली प्रक्रिया. आजअखेर शेवगाव नगराध्यक्षपदावरचा पडदा उघडला. राज्य शासनाने जाहीर केलेल्या आरक्षण सोडतीत शेवगाव नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित राहिले. या निर्णयाने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली असून, शहरात आता महिलाराज असणार. नगराध्यक्षपद महिलांसाठी खुले झाल्याने शेवगावच्या राजकारणात नवीन समीकरणे तयार होऊ लागली. अनेक पुरुष नेत्यांची स्वप्ने धुळीस मिळाली असली तरी शहरातील सक्षम आणि सक्रिय असलेल्या महिलेसाठी ही सुवर्णसंधी ठरणार.गेल्या चार वर्षांपासून नगरपरिषद निवडणुका न झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये निराशेसह मरगळ आली होती.

आरक्षण घोषणेनंतर शहरात पुन्हा राजकीय वातावरण तापले असून पक्षांतर्गत चर्चांना वेग आला. अनेक महिला नेत्यांनी निवडणुकीसाठी तयारी सुरू केल्याची चर्चा गल्लीबोळात चालू झाल्या. शहरातील मतदार आता उत्सुकतेने विचारत आहेत, शेवगावच्या नगराध्यक्षपदी कोण महिला असणार? तिच्या स्वतःच्या कर्तृत्वाने की राजकीय घराण्याच्या पाठबळावर? पक्षबांधणी, गटबाजी आणि नव्या उमेदवारांचा शोध या सगळ्याची सुरुवात सोडतीनंतर झाली आहे. आता शेवगावच्या राजकारणात महिलांचा प्रभाव वाढणार, हे निश्चित. चार वर्षे प्रतीक्षेत राहिलेल्या नगरपरिषद निवडणुकीला आता गती मिळणार असून, या निवडणुकीत शेवगावच्या राजकारणाचा नवा अध्याय सुरू होणार आहे आणि तोही महिलांच्या नेतृत्वाखाली.

# आरएसएसच्या नाण्याविरोधात पीपल्सची बहिष्काराची हाक

**अहमदनगर । रयत समाचार**


आरएसएसच्या शताब्दीनिमित्त जारी १०० रुपयांच्या स्मारक नाण्याविरोधात पीपल्स हेल्पलाईनने बहिष्काराची हाक दिली आहे. हे नाणे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांना धक्का देणारे व संविधानाचा अवमान करणारे असल्याचा आरोप ॲड. कारभारी गवळी यांनी केला. त्यांनी सांगितले की, स्मारक नाणी ही केवळ आर्थिक व्यवहाराचे साधन नसून राष्ट्रीय मूल्यांचे प्रतीक असतात. यापूर्वी जारी झालेली नाणी एकात्मता व समतेचे दर्शन घडवणारी होती; मात्र विशिष्ट विचारसरणीशी संबंधित संस्थेला दिलेला सन्मान राज्य-धर्म विभक्ततेच्या तत्त्वाला बाधा पोहोचवतो. धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मांचा समान आदर व राज्याची तटस्थता हेच भारताच्या सामाजिक एकात्मतेचे मूळ असल्याचे गवळी यांनी स्पष्ट केले. संविधानाशी निष्ठा असलेले नागरिक, शिक्षक, पत्रकार, समाजसेवक व विद्यार्थी यांच्या वतीने या बहिष्काराला पाठिंबा देण्यात आला आहे.

# ८ ऑक्टोबरला माहिती अधिकार चर्चासत्र

## राज्य माहिती आयुक्त भूपेन्द्र गुरव यांची उपस्थिती

**अहमदनगर । रयत समाचार**

माहिती अधिकार सप्ताहानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात ता. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता महत्त्वपूर्ण चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रास राज्य माहिती आयोगाच्या नाशिक खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त भूपेन्द्र गुरव अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या निमित्त माहिती




अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात जनजागृती, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा होणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून सर्व जनमाहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी, माहिती अधिकार कार्यकर्ते तसेच नागरिकांना या चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहिती अधिकार हा नागरिकांचा मूलभूत हक्क असून पारदर्शक शासनप्रणालीसाठी प्रत्येकाने या चर्चासत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेले निर्णय हेच सणाचे खरे औचित्य- चेअरमन किसन कोलते



**अहमदनगर । रयत समाचार**

येथील बोल्हेगाव विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या वतीने दसऱ्यानिमित्त सभासदांना मिठाईचे वाटप करण्यात आली. यावेळी सभासदांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक कुमार वाकळे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सभासदांना मिठाईचे वाटप करण्यात आले. चेअरमन किसन उमाजी कोलते यांनी सांगितले, शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. सोसायटीच्या माध्यमातून सभासदांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ, कर्जवाटप, तसेच कृषी मार्गदर्शनाची सुविधा सातत्याने देण्यात येते. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी हेच आमचे कार्यक्षेत्र आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेले निर्णय हेच आमचे सणाचे खरे औचित्य आहे, असे भावनिक उद्गार चेअरमन कोलते यांनी यावेळी काढले. यावेळी कुमार वाकळे म्हणाले, सोसायटी ही शेतकऱ्यांची खरी साथीदार असून शेतीविषयक मार्गदर्शन, कर्जसुविधा व विकास योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याचे कार्य ती नेहमीच करते. समाजातील आर्थिक आणि कृषी प्रगतीसाठी अशा संस्था अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या कार्यक्रमात सोसायटीची वार्षिक सभा सुद्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. मंचावर चेअरमन किसन उमाजी कोलते, व्हा. चेअरमन सूर्यभान वाटमोडे, सचिव रेवजी निमसे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला रुपचंद कळमकर, सुनील देठे, संपत पाटील वाकळे, बबन कळमकर, बाबाजी वाकळे, मोहन डूरकुले, सुभाष वाकळे, कांतिलाल वाकळे, ज्येष्ठ नागरिक कचरू नाना वाकळे, राजू देठे, रेहमान सय्यद, बबन कराळे, बहरू कराळे, ज्ञानदेव कापडे, संपत आरडे, रामचंद्र कोलते, वैभव वाटमोडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज वाकळे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैभव वाटमोडे यांनी मानले.

# कांबळे यांचे शेतकरी शिल्प

# अमित शहांच्या दारी, व्हाया कोल्हे कंपनी !




प्रमोद कांबळे यांचे चिरंजीव शुभंकर कांबळे यांनी कोल्हेंच्या संजिवनी गृपसाठी तयार केलेले शेतकरी शिल्प ता.५ रोजी केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांना कोल्हे कंपनी यांनी भेट दिले.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# ‘वादळी स्वातंत्र्य’चा वर्धापन दिन उत्साहात

## विशेषांकाचे प्रकाशन व वादळी सन्मान पुरस्कार वितरण

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

साप्ताहिक वादळी स्वातंत्र्यच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त विशेषांक प्रकाशन व ‘‘वादळी सन्मान पुरस्कार’’ वितरण सोहळा नगरपरिषदेच्या कम्युनिटी हॉल, पंतनगर, श्रीगोंदा येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ह.भ.प. आबासाहेब नवले महाराज यांनी भूषविले. या सोहळ्यात जिल्ह्यातील तसेच श्रीगोंदा-दौंड तालुक्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५५ मान्यवर व्यक्ती व संस्थांचा शाल, पुष्पगुच्छ व ‘‘वादळी सन्मान पुरस्कार’’ देऊन गौरव करण्यात आला. तसेच साप्ताहिकाचा १६ पानी रंगीत विशेषांक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. कार्यक्रमाला शुभेच्छा देताना माजी मंत्री बबनराव पाचपुते म्हणाले की, वादळी स्वातंत्र्यचे संपादक जितेंद्र पितळे यांनी निर्भीड पत्रकारितेबरोबरच



लोकाभिमुख बातम्यांना स्थान दिले असून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम सातत्याने केले आहे. हा वर्धापन दिन हा साप्ताहिकाच्या संघर्ष, सेवाभाव आणि समर्पणाच्या प्रवासाचे प्रतीक आहे. आगामी काळात वादळी स्वातंत्र्यची वाटचाल दैनिकांप्रमाणेच तोलामोलाची राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप आबासाहेब नवले महाराज यांनीही साप्ताहिकाच्या सातत्यपूर्ण कार्याचा गौरव करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संपादक जितेंद्र पितळे यांनी स्वागतपर भाषणात जनतेचे पाठबळ, जाहिरातदारांचे सहकार्य व टीम वादळी स्वातंत्र्यच्या अथक प्रयत्नांमुळेच ही वाटचाल अखंड सुरू राहील, अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमास विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे बंधू अमोल गोरखे, नगरसेवक महावीर पटवा, खरेदी-विक्री संघाचे संचालक प्रकाश निंभोरे, वांगदरी सोसायटीचे चेअरमन राजेंद्र नागवडे, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे, नागवडे साखर कारखान्याचे संचालक ॲड. बाळासाहेब काकडे, दैनिक सिटीझनचे सोहेल शेख, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, अमोल झेंडे, गोरक्षनाथ ओहोळ, नागरिक व वादळी स्वातंत्र्यची टीम मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदन गडदे, संतोष जठार व अनंता पवार यांनी केले. आभारप्रदर्शन संदीप दळवी व गणेश लाढाणे यांनी मानले.

# बाजार समिती सभापती, उपसभापतींच्या मानधनात वाढ

## सदस्यांनाही अच्छे दिन

**बेलापूर । शफीक बागवान**




राज्यभरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अन उपसभापतींच्या मानधनात घसघशीत अशी वाढ करण्यात आली आहे. ती पूर्वीपेक्षा दीडपट अधिक आहे. सदस्यांना देखील यापुढे भत्ता मिळणार असल्यामुळे त्यांना अच्छे दिन आले आहेत. मात्र ज्या बाजार समित्या तोट्यात आहेत तेथील सभापती आणि उपसभापतींना या वाढीतून वगळण्यात आले आहे यामुळे ते हिरमुसले आहेत. सभापती उपसभापतींच्या मानधनात वाढ करण्यापूर्वी बाजार समितीच्या उत्पन्नाचे निकष ठरविण्यात आले आहे. बाजार समिती यांचा व्यवहार हा दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा होत असतो. सभापती उपसभापतींना मानधन वाढी संदर्भातील मागणी ही जुनीच होती. यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात आला. तोट्यातील बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापतींना या लाभातून वगळण्यात आले आहे.

सभापती उपसभापतींच्या मानधन आणि भत्त्यात सर्वाधिक वाढ पंचवीस हजार तर सर्वात कमी ही ५ हजार रुपयांची असणार आहे. पूर्वी ती १० हजार तर सर्वात कमी १ हजार २५० रुपये अशी होती. सदरची मानधन आणि भत्त्यातील वाढी साठी गतवर्षीचा निकष लावण्यात आला असून ज्या बाजार समिती तोट्यात होत्या तेथील सभापती आणि उपसभापतींना ही वाढ मिळणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. सभापती आणि उपसभापतींच्या मानधन आणि भत्त्यात वाढ करण्याबरोबरच सदस्यांच्याही दैनिक भत्त्यात मोठी वाढ करण्यात आली आहे. सभापती उपसभापतींबरोबरचसदस्यांनाही हा भत्ता मिळणार असल्यामुळे त्यांच्यात चैतन्य पसरले आहे. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सदस्यांना हा दैनिक भत्ता सातशे रुपये, नगरपालिका क्षेत्रात १ हजार, महानगरपालिका क्षेत्रात १ हजार ५०० तर राज्य महानगरपालिका क्षेत्रात दोन हजार रुपयापर्यंतचा हा भत्ता वाढविण्यात आला आहे. सरकारने सभापती उपसभापती तसेच सदस्यांनाही मानधन आणि भत्त्यात वाढ केल्याने त्यांच्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# स्व. निर्मलाताई काकडे स्मारक समितीसाठी रविवारी सहविचार सभा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याने अमिट ठसा उमटविणाऱ्या, विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या स्व. निर्मलाताई काकडे यांच्या कार्याला स्मारकाच्या रूपाने चिरंतन ठेवण्यासाठी ‘स्व. निर्मलाताई काकडे स्मारक समिती’ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीच्या गठनासाठी रविवार ता. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता, विद्यानगरी कॅम्पस, पाथर्डी रोड, शेवगाव येथे सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्व. निर्मलाताई काकडे या कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या सहचारिणी होत. प्रतिकूल परिस्थितीत स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी उच्च शिक्षण घेतले व बी.ए., बी.टी. या पदव्या संपादन केल्या. १९६० ते १९८४ या काळात दौंड, अहमदनगर आणि शेवगाव येथे त्यांनी शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून कार्य केले. शेवगाव येथे त्यांनी स्थापन केलेले ‘छात्रालय हायस्कूल’ (सध्याचे आबासाहेब काकडे विद्यालय) हे त्यांच्या शिक्षणप्रेमाचे प्रतीक ठरले. त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे त्या काळात अनेक पालकांनी आपल्या मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. यामुळे असंख्य ग्रामीण मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी होता आले.



आजही त्यांच्या कार्याचा ठसा शैक्षणिक क्षेत्रात मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतो. या स्मारक समितीच्या माध्यमातून स्व. निर्मलाताईंच्या कार्याचे दस्तावेजीकरण, स्मारक निर्मिती तसेच त्यांच्या जीवनावर आधारित चरित्रग्रंथ प्रकाशन याबाबत या बैठकीत चर्चा होणार आहे. स्मारक समितीत सहभागी होऊ इच्छिणारे अथवा सहविचार सभेला उपस्थित राहू इच्छिणाऱ्यांनी दीपक बोडखे (मो. ८२०८०७७१८४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.



# नवदुर्गा सन्मान सोहळ्यात स्त्रीशक्तीचा गौरव; कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**नगरतालुका । रयत समाचार**

निमगाव वाघा येथे नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्त्रीशक्तीचा गौरव करणारा नवदुर्गा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. हा सोहळा स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि नगर तालुका तालिम सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात देवीची प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात आणि पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सरपंच उज्वला कापसे, कार्यक्रमाचे संयोजक व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, युवा मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगरे व बचत गटातील महिलांची मोठी उपस्थिती होती. प्रास्ताविकात पै. नाना डोंगरे यांनी सांगितले की, महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली प्रगती साधली असून, त्यांच्या सन्मानार्थ हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. महिला सक्षमीकरणामुळे समाजाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असे त्यांनी नमूद केले. पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे म्हणाल्या की, सोशल मीडियावर अनेक फसवणुकीचे प्रकार घडतात; महिलांनी आपली वैयक्तिक माहिती, फोटो किंवा व्हिडिओ शेअर करताना खबरदारी घ्यावी. सेफ इंटरनेट वापराचा प्रसार करणे ही काळाची गरज आहे. कार्यक्रमात सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सरपंच उज्वला कापसे, कृषी व्यवस्थापक रोहिणी आगरकर, कवियत्री सरोज आल्हाट, वैद्यकिय डॉ. अस्मिता खिस्ती, शिक्षण क्षेत्रातील मुख्याध्यापिका संगीता फुलसौंदर, सहकार क्षेत्रातील वैशाली वर्पे, महसूल सेवक सुनीता जाधव, बचत गटातील सोनाली फलके व मंगल ठाणगे, शैक्षणिक क्षेत्रातील देवकी ढोकणे व पूर्वा खिस्ती यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप आगरकर यांनी केले आणि आभार संदीप डोंगरे यांनी मानले.

# सोनम वांगचुक यांची त्वरित सुटका करून लेह- लडाख नागरिकांच्या मागण्या मान्य करा-भाकप

**शेवगाव । रयत समाचार**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण तज्ञ डॉ. सोनम वांगचुक यांच्या त्वरित सुटकेसाठी आणि लेह-लडाख नागरिकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्यासाठी राज्यव्यापी मागणी दिवस पाळण्यात आला.

यानिमित्त शेवगाव तालुक्यात तहसीलदार आकाश दहाडदे यांना पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, २६ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिक्षणतज्ञ, पर्यावरण अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. सोनम वांगचुक यांना केंद्र सरकारने राष्ट्रीय सुरक्षा कायदा (NSA)




अंतर्गत अटक केली असून त्यांना जोधपूर तुरुंगात ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. अटकेनंतर त्यांचा कुटुंबीयांशी संपर्क साधता आला नाही, तसेच लडाखमध्ये कर्फ्यू लावून इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. ही कृती संविधान विरोधी, नागरी हक्कांची पायमल्ली करणारी व हुकूमशाही प्रवृत्तीची असल्याचा आरोप पक्षाने केला आहे. सोनम वांगचुक यांनी शिक्षण, पर्यावरण, विज्ञान-तंत्रज्ञान व समाजसेवा क्षेत्रात भरीव कामगिरी करून देशाचे नाव उज्वल केले आहे. लडाखमध्ये त्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन हे अहिंसक पद्धतीने न्याय मागण्यासाठी चालू होते. यात लडाखला राज्याचा दर्जा देणे, राज्यघटनेचे सहावे परिशिष्ट लागू करणे, लडाखसाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग स्थापन करणे, तसेच संसदेची जागा वाढवणे या मागण्या होत्या. केंद्र सरकारने मात्र आंदोलन दडपण्यासाठी गोळीबार करून चार जणांचा बळी घेतला व शेकडो नागरिकांना जखमी केले. निवेदनात या घटनेची चौकशी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सोनम वांगचुक यांची तात्काळ सुटका न झाल्यास देशभर सनदशीर मार्गाने जनआंदोलन उभे करू, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सचिव ॲड. बन्सी सातपुते, तालुका सचिव संदीप इथापे, भगवान गायकवाड, बबनराव पवार, बाळासाहेब गायकवाड, गोरक्षनाथ काकडे, गणेश साळवे, ॲड. तमिजखान पठाण, राजेंद्र नांगरे, सुभाष मोहिते, संभाजी नांगरे, जीवन आंगरखे, संदीप सातपुते आदी उपस्थित होते.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत कुबेर जिरेसाळ प्रथम

**पाथर्डी । नितीन गटाणी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत जिल्हा क्रीडा विभाग, अहिल्यानगर व बाबूजी आव्हाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पाथर्डी शहरातील बाबूजी आव्हाड महाविद्यालय येथील लोकनेते कै. गोपीनाथ मुंडे क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय अंतरमहाविद्यालयीन तसेच ज्युनिअर व युवा गटातील वेटलिफ्टिंग (भारोत्तोलन) अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत शहरातील श्री स्वामी विवेकानंद विद्यालयाचा विद्यार्थी कुबेर संतोष जिरेसाळ याने ज्युनिअर गटातील ५५ किलो




वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक जिंकले. याशिवाय, युवा गटातील स्पर्धेतही त्याने सहभाग नोंदवून तृतीय क्रमांक मिळवत रौप्यपदक आपल्या नावावर केले. या यशामुळे कुबेर जिरेसाळ याने आपल्या विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्याला या प्रवासात विद्यालयाचे प्राचार्य शरद मेढे, क्रीडाशिक्षक रावसाहेब मोरकर, जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे व सचिव विजय देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# कोल्हार-राजुरी रस्त्यावरील नापिक झालेल्या जमिनींची पाहणी

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन- कॉ. ॲड. सुभाष लांडे

**कोल्हार । रयत समाचार**

कोल्हार-राजुरी रोडवरील पश्चिमेकडील शेतकऱ्यांच्या जमिनी अतिवृष्टीमुळे नापिक होण्याच्या स्थितीत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. ऍड. सुभाष लांडे यांनी रविवारी कोल्हार परिसरात भेट देऊन बाधित शेतकऱ्यांच्या शेतजमिनींची पाहणी केली. त्यांच्यासमवेत भाकपचे जिल्हा सचिव कॉ. ऍड. बन्सी सातपुते, महिला फेडरेशनच्या राज्य उपाध्यक्षा कॉ. प्रा. स्मिता पानसरे, कॉ. बेबीनंदा लांडे आदी उपस्थित होते. या भागात गेल्या काही वर्षांपासून बिगरशेती प्लॉटमुळे नैसर्गिक नाले, चर व पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडविला गेला आहे. पावसाळ्यात पाण्याचा निचरा न झाल्याने गरीब व



अल्पभूधारक शेतकऱ्यांची घरे आणि शेती जलमय होते. पश्चिमेकडील परिसरात केवळ एका चऱ्यातून पाणी वाहते, परंतु निवासी वापरासाठी करण्यात आलेल्या प्लॉट्समध्ये टाकण्यात आलेले तीन फ ूट सिमेंट पाईप चोकअप झाल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. कॉ. सुरेश पानसरे यांनी हे प्रकरण कॉ. ऍड. सुभाष लांडे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने पाहणी करून या प्रकरणाची संपूर्ण माहिती पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना देण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाने लवकरात लवकर उपाययोजना न केल्यास बाधित शेतकऱ्यांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करू, असा इशारा त्यांनी दिला. युनायटेड कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ.प्रा. एल.एम. डांगे यांनी हा मुद्दा पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांच्यापर्यंत पोहोचविला होता. डॉ. कांगो यांनी तत्काळ राज्य सचिव ऍड. सुभाष लांडे यांना कोल्हारला जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः कोल्हार परिसराची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना अतिक्रमण हटविण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु प्रत्यक्षात उपाययोजना न झाल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढला आहे. कॉ. ऍड. सुभाष लांडे म्हणाले, शेतकऱ्यांच्या हक्काचा प्रश्न आहे. प्रशासनाने तातडीने नाले व पाणी वाहण्याचा मार्ग मोकळा करून नुकसानग्रस्तांना मदत द्यावी. अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून लढा देऊ.

# संध्या व्ही. शांताराम रुपेरी पडद्यावरचा नृत्य, अभिनय आणि सौंदर्याचा त्रिवेणी संगम



'संध्या व्ही. शांताराम गेल्या' ही बातमी कानावर पडताच मनात एक वेगळंच ओझं दाटून आलं. त्यांनी साकारलेल्या हिंदी आणि मराठी चित्रपटांतील असंख्य भूमिका डोळ्यासमोर तरळू लागल्या. अभिनयातील त्यांची एक खास जादू होती. त्यांच्या प्रत्येक भूमिकेला प्रेक्षकांची दाद मिळाली आणि त्या विशेषतः त्यांच्या नृत्यामुळे अजरामर झाल्या. त्यांच्या प्रत्येक चित्रपटातील हावभाव, मुखमुद्रा, आणि अभिव्यक्ती इतकी भावपूर्ण होती की ती दृश्यं आजही रसिकांच्या मनात कोरलेली आहेत. ''झनक झनक पायल बाजे'' मधील त्यांच्या नृत्याच्या लयीतून आणि ''पिंजरा''तील तीव्र अभिनयातून त्यांनी स्वतःची ओळख एक नर्तकी आणि एक भावनासंपन्न अभिनेत्री म्हणून कायमस्वरूपी निर्माण केली. संध्या यांचे मूळ नाव विजया देशमुख. त्यांची मोठी बहिण वत्सला देशमुख यांच्या प्रेरणेने त्या चित्रपटसृष्टीत आल्या. कलाक्षेत्राचा वारसा नव्हता, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास आणि मेहनतीचा संगम होता. बॅकस्टेजचं काम करणाऱ्या रंगमंच-कर्मचाऱ्याची ती मुलगी; रंगमंचावर छोट्या भूमिका करून सुरुवात करणारी विजया देशमुख नियतीच्या नियोजनानुसार लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार होती. व्ही. शांताराम हे 'अमर भूपाळी' या चित्रपटासाठी नव्या चेहऱ्याच्या शोधात होते. वत्सला यांनी बहिणीला ऑडिशनला पाठवलं. विजया यांच्या स्क्रीन टेस्टनंतर शांताराम थोडे साशंक झाले; पण त्यांच्या हावभावांमध्ये आणि आवाजात त्यांनी एक सच्चेपणा पाहिला. चेहऱ्यावरील साधेपणात त्यांना अस्सल सौंदर्य दिसलं. अखेर त्यांनी तिचं नाव 'संध्या' असं ठेवलं, आणि १९५१ साली प्रदर्शित झालेल्या ''अमर भूपाळी'' ने संध्या यांचा रजतपटावरचा सुवर्ण प्रवास सुरू झाला. १९५२ मध्ये ''परछाई'' प्रदर्शित झाला आणि संध्या व व्ही. शांताराम यांचं प्रेम फुलू लागलं. १९५६ मध्ये त्यांनी विवाह केला आणि त्यानंतर त्यांच्या कलायात्रेने नवा आयाम गाठला. शांताराम यांच्या दिग्दर्शनात संध्या यांचा अभिनय नवनवीन रंगांनी खुलला. ''झनक झनक पायल बाजे'' हा त्यांचा कलात्मक मैलाचा दगड ठरला. नृत्य शिकण्यासाठी संध्या यांनी प्रख्यात नृत्यदिग्दर्शक गोपीकृष्ण यांच्याकडून अठरा अठरा तास तालीम घेतली. मेहनतीच्या घामातून झळकलेले हे नृत्य भारतीय चित्रपटसृष्टीत अजरामर ठरले. त्या चित्रपटाने चार फिल्मफेअर पुरस्कार आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळवला. त्यानंतर ''दो आँखें बारह हाथ'' (१९५७) मध्ये चंपा या भूमिकेत त्या झळकल्या. त्याच चित्रपटातील ''ऐ मालिक तेरे बंदे हम'' हे गीत आजही प्रत्येक भारतीयाच्या ओठांवर आहे. संध्या आणि शांताराम यांचा ''नवरंग'' (१९५९) हा चित्रपट भारतीय सिनेमाच्या इतिहासात कलात्मक उत्कटतेचं प्रतीक ठरला. ऑपरेशननंतर संध्या यांनी फुलांनी सजवलेली खोली पाहताच शांताराम यांनी आपल्या पुढील चित्रपटाचे नाव 'नवरंग' असं घोषित केलं. यानंतर त्यांच्या नात्यातील कलात्मक जवळीक अधिक दृढ झाली आणि भारतीय सिनेमात अभूतपूर्व कलात्मकता साकारली. संध्या यांनी या चित्रपटात साकारलेल्या शकुंतलेच्या भूमिकेत स्त्रीत्वाचं शास्त्रीय आणि भावनात्मक रूप खुललं. ''आया होली का त्योहार'' आणि ''नैन सो नैन नाहीं मिलाओ'' या गाण्यांमधील त्यांचा नृत्याविष्कार आजही लोकांच्या मनात जिवंत आहे. नंतरच्या काळात ''सेहरा'' (१९६३), ''स्त्री'' (१९६१) आणि ''जल बिन मछली, नृत्य बिन बिजली'' (१९७१) सारख्या चित्रपटांमधून त्यांनी नवनव्या व्यक्तिरेखा साकारल्या. मराठी चित्रपटसृष्टीत ''पिंजरा'' (१९७२) हा त्यांचा सर्वाधिक गाजलेला चित्रपट ठरला. डॉ. श्रीराम लागू यांच्यासमवेत साकारलेल्या त्या भूमिकेत त्यांनी तमाशा कलावंताच्या माध्यमातून स्त्रीच्या अस्तित्वाचा, समाजातील अन्यायाचा आणि स्वाभिमानाच्या संघर्षाचा विलक्षण संगम साकारला. ''मला लागली कुणाची उचकी'' हे गीत आणि त्यातील संध्या यांचा अभिनय आजही मराठी सिनेप्रेमींसाठी अविस्मरणीय आहे. ''पिंजरा''साठी त्यांना फिल्मफेअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. त्यानंतर ''चंदनाची चोळी अंग अंग जाळी'' या चित्रपटानेही त्यांच्या अभिनयाची छाप अधिक दृढ केली. संध्या यांचा कलात्मक प्रवास १९५१ ते १९७५ या कालखंडात झळकत राहिला. ''अमर भूपाळी'', ''तीन बत्ती चार रास्ता'', ''झनक झनक पायल बाजे'', ''दो आँखे बारह हाथ'', ''नवरंग'', ''सेहरा'', ''स्त्री'', ''लड़की सह्याद्री की'', ''जल बिन मछली नृत्य बिन बिजली'', ''पिंजरा'' आणि ''चंदनाची चोळी अंग अंग जाळी'' हे त्यांचे गाजलेले चित्रपट भारतीय चित्रसृष्टीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरलेले आहेत. भारतीय रुपेरी पडद्यावर नृत्य, अभिनय आणि सौंदर्य यांचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या या तेजस्विनी मूर्तीने कला, संस्कार आणि सौंदर्य यांचे अप्रतिम नाते प्रस्थापित केले. त्यांनी अभिनयाला अध्यात्माची छटा आणि नृत्याला आत्म्याची लय दिली. आज त्या आपल्यात नाहीत, पण त्यांच्या आठवणींचा ''नवरंग'' आजही आपल्या मनात फुलतो, आणि त्या फुलांचा सुगंध म्हणजेच संध्या यांच्या कलेची अमर गंधवार्ता आहे.



गुरुदत्त वाकदेकर
९९८७७४६७७६
**स्मृतीवार्ता**





## जायकवाडी पाणीपुरवठा योजनेचा पहिला टप्पा सुरू

# एमआयडीसी उभारणीसाठी प्रयत्न चालू- आमदार राजळे

**पाथर्डी । नितीन गटाणी**

शासनाची कोणतीही योजना किंवा विकासकामे असो, त्यात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले. आज शहरातील नवी पेठेत जायकवाडीपाथर्डी पाणीपुरवठा योजनेचा (गावठाण) टप्पा क्रमांक एक सुरू करण्यात आला. या प्रसंगी १९ लक्ष लिटर क्षमतेच्या जल कुंभाचे लोकार्पण आमदार राजळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, सध्या सुरू असलेली जायकवाडी पाणीपुरवठा योजना कालबाह्य झाली होती; मात्र सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर नवीन योजनेला मंजुरी मिळाली आहे. या योजनेमुळे शहरवासीयांना स्वच्छ, नियमित, पूर्ण दाबाने व मुबलक पाणी मिळणार आहे. त्यांनी नागरिकांना नाममात्र असलेली पाणीपट्टी नियमित भरून योजनेला सुरळीत चालवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. आमदार राजळे यांनी पुढे सांगितले की, शेवगावपाथर्डी तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी एमआयडीसी उभारण्याचे नियोजन असून यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या पाठपुराव्याद्वारे मुळा, जायकवाडी किंवा इतर ठिकाणाहून पाणी स्रोत उपलब्ध करणे आणि त्यासाठी सर्वेक्षण करण्याची मागणी सरकारकडे करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी केले, तर आभार माजी नगरसेवक बजरंग बोडके यांनी मानले. यावेळी माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, डॉ. मृत्युंजय गर्जे, प्राचार्य अजय भंडारी, मुकुंद लोहिया, नंदकुमार शेळके, तालुका अध्यक्ष धनंजय बडे, रमेश गोरे, बजरंग घोडके, युवकांचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, अमोल गर्जे, प्रसाद आव्हाड, राजेंद्र दुधाळ, सुभाष बोरुडे, मुकुंद गर्जे, प्रशांत शेळके, नितीन एडके, ॲड. प्रतीक खेडकर, गणेश सोनटक्के, पुरुषोत्तम इजारे, ज्योती शर्मा, सुलभा बोरुडे, सिंधू साठे आदी उपस्थित होते.

# डॉ. अश्विनी सोनवणे यांचे होमिओपॅथी मार्गदर्शन शिबिर

**पुणे । शिवाजी घुगे**



प्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. अश्विनी कैलास सोनवणे यांनी ४ व ५ ऑक्टोबर रोजी पुणे येथे आयोजित To be rational, not irrational या दोन दिवसीय प्रगल्भ मार्गदर्शन शिबिरात महाराष्ट्रासह भारतातील विविध राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना आधुनिक उपचार पद्धतीवर सखोल मार्गदर्शन दिले. शिबिरामध्ये होमिओपॅथीतील नवीन तंत्रज्ञान व आधुनिक पद्धतींचा प्रभावी उपयोग कसा करावा यावर अभ्यासपूर्ण सत्रे घेतली गेली.'Innovating the uncommon, delivering the common' या विषयावर डॉ. सोनवणे यांनी विशेष मार्गदर्शन केले. मार्गदर्शन सत्रांमध्ये शंका समाधान, केस स्टडीज आणि प्रत्यक्ष अनुभव दाखवून आधुनिक होमिओपॅथीचे विविध पैलू उलगडले गेले. उपस्थित डॉक्टरांना नव्या उपचारविधींचा आत्मविश्वास आणि विश्वास मिळाला. शिबिरामुळे ग्रामीण व शहरी भागातील उपचार व्यवस्थेत सुसूत्रता व नाविन्य आणण्यास मदत होते, तसेच डॉक्टरांच्या ज्ञानात सतत अद्ययावतता राखण्यास हातभार लागतो. सहभागी डॉक्टरांनी या मार्गदर्शनातून मिळालेल्या आधुनिक उपचार समज, कार्यक्षमता आणि विश्वास याबाबत समाधान व्यक्त केले.

# मिशन माणुसकी : दैनिक रयत समाचारच्या पूरग्रस्त सहकार्य आवाहनास प्रतिसाद





स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी संघटनेचे यशवंत तोडमल यांनी मिशन माणुसकी पुरग्रस्त सहयोग निधीचे सहकार्य केले, समवेत उपसंपादक तुषार सोनवणे. (एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)

# श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्षपद खुले

## समाजवादी आणि एमआयएम पक्षही मैदानात उतरणार

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

प्रदीर्घ काळानंतर श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद हे सर्वांसाठी खुले झाले. यामुळे मात्र मोठ्या प्रमाणात सत्ता संघर्ष होण्याची चिन्हे आहेत. इच्छुकांची वाढती संख्या लक्षात घेता प्रत्येकाला मतदारांची मोठी गरज भासणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी बरोबरच समाजवादी आणि एमआयएम पक्षही मैदानात उतरणार असल्याचे संकेत आहेत. राज्यासह श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष पदाची आरक्षण सोडत आज मुंबईत काढण्यात आली. ती सर्वांसाठी खुली निघाली असून सर्वसामान्यांच्या चर्चा आणि अंदाजानुसार ती यशस्वी ठरली आहे.





निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढविणार असले तरी स्थानिक पातळीवर हे सर्वजण एकत्रित आणि एकमेकांना पाठिंबा देतील का यासाठी निवडणुकीला सुरुवात होऊ द्यावी लागणार आहे. विधानसभा निवडणुकीत पक्षश्रेष्ठी आणि नेते यांच्यात संवाद न झाल्यामुळे महायुतीत मोठी फंद फितुरी झाली. मात्र नगरपालिकेची निवडणूक ही वेगळी ठरणार आहे. सध्या श्रीरामपूर नगरपालिकेच्या जनतेतून निवडून द्यावयाच्या नगराध्यक्ष पदासाठी अनेक जण इच्छुक असले तरी ऐनवेळी काही अपक्षही आपले नशीब आजमावतील.

महायुती आणि महाविकास आघाडी बरोबरच समाजवादी आणि एमआयएम पक्ष देखील उमेदवार देण्याची शक्यता आहे. लोकनियुक्त माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक, करण ससाने, प्रकाश चित्ते, अशोक कानडे, सागर बेग अशा दिग्गजांची नावे सध्या मतदारांच्या तोंडी आहे. सद्यस्थितीत महायुतीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे, अविनाश आदिक, अनुराधा आदिक, माजी आमदार लहू कानडे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, भानुदास मुरकुटे, भाऊसाहेब कांबळे, यांचा समावेश आहे. तर महाविकास आघाडीत खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले, करण ससाने, लकी सेठी, अशोक थोरे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना तसेच शरदचंद्र पवार राष्ट्रवादीचे पदाधिकारी यांचा समावेश आहे. भाजपातून निलंबित झालेले प्रकाश चित्ते हे निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे चित्ते हे निष्ठावंत समजले जातात. शहरातील भाजपाचे निष्ठावंत फळीतील कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी उभे आहेत. मुरकुटे यांचे विखे अधिक यांच्याशी विळ्या भोपळ्याचे राजकारण आहे. अनुराधा आदिक करण ससाणे यांचे सहज चित्ते, बेग यांचे सोशल मीडियावर वेगवेगळ्या स्लोगन चे रिल्स व्हायरल झाले आहेत. नगरसेवक पदांच्या आरक्षणावरच नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीची रणनीती आखली जाऊ शकते.

# आध्यात्मिक वृत्तीने काम केल्यास मनात विकाराची भावना नाही- पुजारी

**नितीन गटाणी । पाथर्डी**

चांगदेव हे योगमार्गातील अधिकारी पुरुष होते. योगसामर्थ्याच्या बळावर ते १४०० वर्षे जगले अशी मान्यता आहे. योगी असूनही चांगदेवांमध्ये गुरुकृपेची कमतरता असल्यामुळे त्यांच्या मनात अहंकाराचा विकार निर्माण झाला. पुढे चांगदेवांनी १४ वर्षे वयाच्या मुक्ताबाईंना गुरू मानले. त्यानंतर गुरुकृपेने त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. आध्यात्मिक वृत्तीने कर्म केल्यास मनात विकाराची भावना निर्माण होत नाही, असे चिंतन पाथर्डी पोलीस ठाण्याचे निरीक्षक विलास पुजारी यांनी व्यक्त केले. पाथर्डी शहरात चार महिन्यांपासून एका जागी बसलेल्या मनोरुग्णाला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केल्यानंतर, त्यांच्या कार्याची दखल घेऊन एकता फाउंडेशन या सेवाभावी संस्थेने केलेल्या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी रयत समाचार या दैनिकाचे विशेष प्रतिनिधी राजेंद्र देवढे, आम आदमी पार्टीचे प्रदेश सचिव सुभाष केकाण, एकता फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कोठुळे, पाथर्डी तालुकाध्यक्ष राजेंद्र उदारे, शेवगाव तालुकाध्यक्ष आत्माराम शेवाळे, कवी प्रदीप बोडखे, शिवाजी डोमकावळे, सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड, पत्रकार नितीन गटाणी, शन्नो पठाण, सचिन दिनकर यांच्यासह नगर परिषदेचे सफाई कामगार उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना पुजारी म्हणाले, पत्रकार राजेंद्र देवढे यांची बातमी दैनिक रयत समाचार या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यावर या इसमाच्या जीवाचं एका रात्रीतून काही बरंवाईट होऊ नये, म्हणून मी ईश्वराकडे प्रार्थना केली. दुसऱ्याच दिवशी या कामाला प्राधान्य देताना मी त्या ठिकाणी गेलो, जेथे हा मनोरुग्ण गेल्या चार महिन्यांपासून बसला होता. तो अंगावरच्या कपड्यातच मलमूत्र विसर्जन करत असल्याने व तेच कपडे परिधान करत असल्याने त्यांच्या अंगाला दुर्गंधी सुटली होती. नगर परिषदेच्या सफाई कामगारांच्या सहकार्याने आम्ही त्याला वॉशिंग सेंटरवर नेऊन साबणाने स्वच्छ धुवून काढले. त्याचे केशकर्तन करुन त्याला नवीन कपडे घातले आणि उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

तेथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. एका बेवारस जीवाला योग्य ठिकाणी पावते केल्याचं आत्मिक समाधान मिळालं. यानंतर त्याला स्नेहालय संस्थेत दाखल करण्याचा विचार आहे. कवी तथा एकता फाउंडेशनचे पाथर्डी तालुकाध्यक्ष राजेंद्र उदारे यांनी प्रास्ताविक करत संस्थेच्या कार्याची माहिती दिली.



**मी राहुल कोठारी यांच्या सदनिकेत भाडेतत्त्वावर राहतो. माझ्या येण्या-जाण्याच्या रस्त्यावरच या मनोरुग्णाने ठाण मांडल्याने त्यासाठी काय करावे या विवंचनेत असतानाच मी ही माहिती पाथर्डीचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या कानावर घातली. परंतु, नवरात्राच्या बंदोबस्तात व्यस्त असल्याने त्यांना वेळ मिळाला नाही. म्हणून मी या घटनेवर बातमी लिहिली. तिची दखल घेऊन पुजारी यांनी मानवतेचा वस्तुपाठ घालून देत त्याची सुश्रुषा करवून घेतली. माझे दिवंगत वडील नारायणराव देवढे हेही अशा बाबतीत कमालीचे संवेदनशील होते. गावात असा माणूस आलाच तर ते स्वत: त्याला आंघोळ घालून स्वच्छ करत असत आणि नवीन कपडे घालून योग्य त्या ठिकाणी पोहोचवत असत. हा वारसा उपजतच लाभला असल्याने मला या मनोरुग्णाची अवस्था पाहवत नव्हती. आजचा सत्कार घेण्याची इच्छा नव्हती. कारण, कोणत्याही अपेक्षेने केलेल्या कर्माला विकार जडतो. परंतु, एकता फाउंडेशनच्या आग्रहाखातर निरिच्छेने का होईना हा सत्कार स्विकारत आहे.**

**- राजेंद्र देवढे,** विशेष प्रतिनिधी, दैनिक रयत समाचार



# मराठा तरुणाईने व्यसन आणि मोबाईलच्या जाळ्यातून बाहेर येण्याची गरज- कदम

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगाव शहरातील श्री जत्तीमठ देवस्थान येथे रविवारी सकल मराठा समाजाच्या वतीने मैसूर दसरा स्पर्धेत यश मिळवलेल्या कुस्तीपटू, त्यांच्या प्रशिक्षक आणि स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात काडा अध्यक्ष युवराज कदम म्हणाले की, मराठा तरुणाई व्यसन आणि मोबाईलच्या जाळ्यात अडकलेली आहे; समाज म्हणून त्यांना परत मार्गावर आणणे हे आपले कर्तव्य आहे. मैसूर दसरा स्पर्धेत यश मिळवलेल्या पैलवानांसह पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थी श्रुती पाटील यांचा सन्मान करण्यात आला. एनआयएस कोच स्मिता पाटील यांनी मराठा समाजाच्या सहा मुलींना पदक मिळवून दिले. यावेळी स्मिता पाटील म्हणाल्या की, अपार मेहनत आणि सरावाने मुलींनी यश मिळवले असून, पुढील वर्षी दुप्पट यश मिळवण्याचा मानस आहे. कडोली गावची किशोरी स्वाती पाटील म्हणाली की, ''कोच स्मिता पाटील यांनी आमच्यात जिद्द निर्माण केली; पुढील वर्षी आम्ही यशाच्या पुढच्या पायरीवर पोहोचू.'' ५३ वर्षांनंतर बेळगावला कर्नाटक कंटीरवा केसरीची गदा खेचून आणणाऱ्या पैलवान कामेश पाटीलसाठी प्रशिक्षक प्रशांत पाटील यांनी अपार अभिमान व्यक्त केला. सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक गुणवंत पाटील आणि वकील अमर येळ्ळूरकर यांनी समाजाने तरुणाईच्या यशस्वी व्यक्तींना पाठिंबा देण्याचे महत्त्व स्पष्ट केले. सकल मराठा समाजाचे नेते किरण जाधव यांनी सांगितले की, खेळाडू आणि अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षकांचे कौतुक करणे आवश्यक आहे कारण यामुळे नव्या पिढीला आदर्श मिळतो. कार्यक्रमात मैसूर दसरा स्पर्धेत यश मिळवलेले पैलवान कामेश पाटील, प्रेम जाधव, महेश बिर्जे, विनायक पाटील, समर्थ डुकरे, स्वाती पाटील, प्रांजल तुळजाई, भक्ती पाटील, सानिका हिरोजी कलखांब, श्रावणी तरळे, अनुश्री चौगुले आणि प्रशिक्षक स्मिता पाटील, प्रशांत पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सकल मराठा समाजाचे नागेश देसाई, प्रशांत भातकांडे, माजी उपमहापौर संजय शिंदे, माजी उपमहापौर रेश्मा पाटील, माजी नगरसेवक राजू बिर्जे, प्रवीण पाटील, सामाजिक कार्यकर्त्या माधुरी जाधव, सुनील चोळेकर, आनंद पाटील, सुनील जाधव, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.